# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

## अधिसभा निवडणूकसाठी व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत

## जाहीर प्रकटन

**संदर्भ क्र. १ : साफुपुविनि/१९, दिनांक १८ जून, २०२२**
**संदर्भ क्र. २ : महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १(८)**
**संदर्भ क्र. ३ : साफुपुविनि/८५, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२**
**संदर्भ क्र. ४ : साफुपुविनि/९८, दिनांक २८ सप्टेंबर, २०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त)[(28(2)(p)] अन्वये संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. याकरिता मतदार नोंदणी करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहित) संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द केल्यानंतर त्याअनुषंगाने संबंधितांकडून निवडणूक विभागास विहित मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेवून संदर्भ क्र. ४ अन्वये दुरुस्त मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली होती. संबंधितांनी सदर दुरुस्त मतदार यादी संदर्भात विहित मुदतीमध्ये दाखल केलेल्या अपीलांबाबत निर्णय घेवून संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेली व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची अंतिम मतदार यादी विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक ४ अन्वये प्रसिध्द झालेल्या मतदार यादीच्या विरोधात सादर झालेल्या अपिलांबाबत मा. कुलगुरु यांनी घेतलेल्या निर्णयाचा तपशिल संबंधित अपिलकर्त्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१२१
दिनांक : २२/१०/२०२२